दिनांक : ७.११.२००३

सादर :-

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९४ वी बैठक सोमवार दि. १६.१०.२००३ रोजी पार पाडली. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

सोबत- वरीलप्रमाणे.

७.११.०३
नि.का.अ./दु.व पु.

1195 Ref
7.11.03

2371-e०/R
7/11/03

मु.अ./मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.सभापती/मुं.इ.दु.व पु.मंडळ

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
गुरुवार दिनांक १६ / १०/ २००३ रोजी झालेल्या ९४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९४ वी बैठक सोमवार दि.१६/ १० / २००३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री.सुरेश कारंडे	मुख्य अधिकारी
३.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
४.	मा.श्री.विश्वास मोकाशी,	सदस्य
५.	मा.श्री.गजेंद्र लष्करी	सदस्य
६.	मा. श्री. रघुनाथ थवई	सदस्य
७.	मा. श्रीमती छाया कल्याणी	सदस्या
८.	मा. श्री. रमेश परब	सदस्य
९.	मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई)	सदस्य
१०.	मा. श्री. मोहन देसाई	सदस्य
११.	मा. श्री. संजय शिर्के	सदस्य
१२.	मा. श्री. अबुबकर मुसा बाटलीवाला	सदस्य
१३.	पमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी	निमंत्रक
१४.	उपकर निर्धारक व संकलक हयांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरवातीस उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी मंडळाचे उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. विजय देशपांडे हयांचे रविवार दि. ५.१०.२००३ रोजी अपघाती निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा शोक प्रस्ताव सादर करुन असे प्रतिपादन केले की, श्री. विजय देशपांडे हे एक अतिशय लोकप्रिय, मनमिळावू व्यक्तीमत्व व हरहुन्नरी अभियंता होते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने मंडळाचे सभापती हया नात्याने तसेच सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी हया सर्वांतर्फे शोकप्रस्ताव सादर करण्याचे सूचवून सदर शोक प्रस्तावाचीं प्रत श्री. विजय देशपांडे हयांचे घरी पाठवावी व त्यांच्या कुटुंबियांना कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास ती करण्याबाबत आपण सर्वांनी लक्ष घालावे.असे आवाहन केले.

तदनुसार उपस्थित मंडळाचे सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारीवर्गाने दोन मिनिटे स्तब्ध उभ राहून उपमुख्य अभियंता श्री. विजय देशपांडे हयांना श्रध्दांजली वाहिली.

तदनंतर मा सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन्मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हे त्यांच्या पक्षकार्याच्या दौ-यामुळे तसेच सन्मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हे आजारी असल्याने मंडळाच्या आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकलेले नाहीत.

तदनंतर मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या. त्यानुसार सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

<u>बाब क्रमांक : ९४ / १</u>

विषय- दि. १२.०९. २००३ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
९३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ४९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांत सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

----------oXoXo----------

<u>बाब क्रमांक : ९४ / २</u>

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(दि. २.०९.२००३ ते १.१०.२००३)

सदर माहिती पृ.क्र.५१ ते ५३ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

----------oo----------

<u>दक्षिण परिमंडळ</u>

<u>बाब क्रमांक : ९४.३ (अ)</u>

विषय- <u>अनुपालन अहवाल.</u>

इ.क्र.२८४-२८६,ए, एम.एस.अली रोड, (खोखा बिल्डिंग व तांबावाला बिल्डिंग) हया इमारतीच्या ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.५५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की,सदर प्रस्ताव मंडळाच्या दि. ०७.०८.२००३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत ठरल्यानुसार हया इमारतीची पाहणी मंडळाचे सदस्य श्रीउस्मान गनी कुरेशी (लालीभाई) हयांनी दि. ३०.०९.२००३ रोजी केली आहे. सदर इमारतीची दुरुस्ती ना.ह.प्र. पत्रांतर्गत (परताव्यासह) सुरु असून पूर्वीच्या दुरुस्तीची कामांमध्ये इमारतीचे क्षेत्रफळ २१८१.४५ चौ.मी. नमूद करण्यात आले होते. मात्र ना.ह.प्र. पत्रधारकांच्या वास्तुशास्त्रज्ञांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार हया इमारतीचे क्षेत्रफळ ४०४८.४७ चौ.मी. आहे. सदर क्षेत्रफळ प्रत्यक्ष जागेवर तपासले असून ते बरोबर आहे. सदर सुधारित क्षेत्रफळास मंडळाची मंजूरी आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मंजूरीसाठी फेरसादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सुधारित क्षेत्रफळास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७४४

इ.क्र.२८४-२८६, ए, एम.एस.अली रोड हया इमारतीच्या एकूण ४०४८.४७ चौ.मी. सुधारित क्षेत्रफळास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---------------------------oo---------------------------

बाब क्रमांक : ९४.३ (ब)

विषय- सन २००३ च्या पावसाळापूर्व पाहणीत आढळलेल्या दक्षिण परिमंडळातील धोकादायक इमारतींची सद्यःस्थिती.

....

सदर माहिती पृ.क्र.५७ ते ६१ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

---------------------------oo---------------------------

बाब क्रमांक : ९४.३ (क)

विषय- सी १-२ विभागातील उपकरप्राप्त इमारतीना टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६३ ते ६५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता / दक्षिण विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, सी १-२ विभागामध्ये एकूण १६३३ उपकरप्राप्त इमारती असून दि.१.११.२००३ ते दि. ३१.१०.२००३ हया कालावधीसाठी हया इमारतींना टेकू लावण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यानुसार एकूण रु. ४,३०,२४८/- खर्चाच्या अंदाजपत्रकास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४/७४५

सी १-२ विभागातील उपकरप्राप्त इमारतीना दि.१.११.२००३ ते दि. ३१.१०.२००३ हया कालावधीमध्ये टेकू लावण्याच्या रु. ४,३०,२४८/- खर्चाच्या अंदाजपत्रकास मंडळाची प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------------------------------oo----------------------------

बाब क्रमांक : ९४.३ (ड)

विषय- इ.क्र.२७३-२८१, फॉकलंड रोड, बादशहा बिल्डिंग हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार जारी केलेले प्रमाणपत्र रद्द करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. ०२.०५.२००३ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिल्यानुसार सदर इमारत , म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. तसेच सन २००३ च्या पावसाळापूर्व पाहणीत सदर इमारत धोकादायक इमारत म्हणून घोषित करण्यात आली आहे. इमारतीतील रहिवाशांना जागा खाली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत परंतु रहिवाशी जागा खाली करण्यास तयार नाहीत. हया इमारतीतील रहिवाशांनी हया इमारतीची दुरुस्ती ना.ह.प्र.पत्रांतर्गत (परताव्यासह) करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे तसेच म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार जारी केलेले प्रमाणपत्र रद्द करण्याचीही विनंती केली आहे. इमारतीला ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केल्यानंतर दुरुस्ती करता येत नाही. रहिवाशी इमारतीच्या पुनर्रचनेस सहकार्य करतील किंवा नाही हयाबाबतही साशंकता वाटते. अशा परिस्थितीत ८८ (३) (अ) प्रमाणपत्र रद्द करुन दुरुस्तीस परवानगी द्यावी किंवा कसे हयाबाबत निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पूर्वी रहिवाशांनी रु.१०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम जमा न केल्याने ही इमारत ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादे पलिकडे घोषित करण्यात आली आहे. त्यावेळी त्यांना निधी उभारता आला नसावा. आता रहिवाशांनी दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केल्याने त्यांनी निधीची व्यवस्था केली असावी. परंतु हया इमारतीच्या पुनर्रचनेबाबत पुनर्रचना विभागाने काय कार्यवाही केली आहे तसेच हया इमारतीची पुनर्रचना करणे शक्य आहे काय ? अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची पुनर्रचना योजना राबविणे शक्य आहे. उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची पुनर्रचना करणे जरी शक्य असले तरी सर्व रहिवाशांचे पुनर्वसन नवीन इमारतीत करणे शक्य होणार नाही.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण पूर्वीही अशा इमारती पुनर्रचित केल्या आहेत. ज्या ठिकाणी सर्व रहिवाशांचे पुनर्वसन करता आलेले नाही. मात्र दि. २५.०१.९९ रोजीच्या शासनाच्या अधिसूचनेतील सुधारित विकास नियंत्रण नियमावली क्र. ३३ (९) नुसार पुनर्रचनेसाठी चटईक्षेत्र निर्देशांक ४.०० किंवा जून्या इमारतीतलील सर्व रहिवाशांचा पुनर्वसनासाठी लागणारा चटईक्षेत्र निर्देशांक (४.०० पेक्षा अधिक असल्यास) हया दोहोपैकी जो अधिक असेल असा चटईक्षेत्र निर्देशांक देय आहे. त्यामुळे जरी अतिरिक्त गाळे उपलब्ध झाले नाहीत तर सर्व रहिवाशांचे पुनर्वसन करणे शक्य होणार आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हया इमारतीत एकूण रहिवाशी किती आहेत व हया प्रस्तावाच्या अनुषंगाने पुनर्रचना विभागाचे मत काय आहे ? व भविष्यात जर प्रचलित मर्यादा रु.१०००/- प्रति चौ.मी. वरुन रु. १२५०/- पर्यंत वाढविल्यास त्याचा काय परिणाम होईल.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीत एकूण ३८ रहिवाशी आहेत. हया इमारतीत नुकतेच ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे. दोन वर्षे रहिवाशांनी रु.१०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम मंडळाकडे न भरल्याने ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केलेल्या इमारती पुनर्रचनेमधून वगळल्यास पुनर्रचनेसाठी इमारती उपलब्ध होणार नाहीत तसेच वाढीव प्रचलित प्रमाणित मर्यादा ही ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केलेल्या इमारतींना लागू होत नाही. ज्या इमारतींना ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केलेले नाही अशाच इमारतींना वाढीव प्रमाणित मर्यादा लागू होते. यामुळे आता जरी प्रचलित मर्यादा रु.१०००/- प्रति चौ.मी. वरुन रु. १२५०/- पर्यंत वाढविल्यास सदर वाढीव प्रमाणित मर्यादा हया इमारतीस लागू होणार नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचनेचा कार्यक्रम गतिमान करण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त इमारतींना ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करणे आवश्यक आहे. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करुन जागा संपादित केल्या असूनही आपण पुनर्रचनेची कामे हाती घेऊ शकलेलो नाहीत. वाणी चाळीच्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने आपण जागा संपादित करुन प्रस्तावित इमारतीच्या नकाशांनाही मंजूरी घेतली आहे. मात्र अद्याप पुनर्रचनेचे काम सुरु करु शकलेलो नाही. असाच प्रकार साहेबराव चाळीच्या पुनर्रचनेबाबतचा आहे. हया दोन्ही चाळींच्या पुनर्रचनेमधून आपणांस मोठया प्रमाणात अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार आहेत.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा प्रकारच्या फक्त चार ते पाचच योजना आहेत. वाणी चाळीमध्ये ९० अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार आहेत. सोहराबजी चाळीच्या पुनर्रचना योजनेमध्ये २२० गाळे उपलब्ध होणार आहेत.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, वाणी चाळीची जागा मंडळाच्या ताब्यात असूनही मंडळामार्फत रहिवाशांकडून भाडे घेतले जात नाही. अशा अनेक भूसंपादित जागेवरील इमारतीच्या रहिवाशांकडून मंडळातर्फे भाडे घेतले जात नाही. त्यामुळे रहिवाशांना ते मंडळाचे किंवा मुळ मालकाचे भाडेकरु आहेत हयाबाबत संभ्रम निर्माण होतो. अशा परिस्थितीत प्रस्तावित इमारतींच्या रहिवाशांवर पुनर्रचनेची सक्ती केल्यास भविष्यात ते मंडळामार्फत पुनर्रचना करुन देतील किंवा नाही याबाबत साशंकता वाटते.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही इमारत धोकादायक इमारत म्हणून घोषित केल्याने तसेच ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी केले असल्याने सदर प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यात आला आहे. इमारत धोकादायक असून रहिवाशांच्या जागा खाली करुन घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले आहेत. विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या दृष्टीने कट आऊटस् काढून टाकण्याबाबत तसेच पाणी पुरवठा बंद करण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात आली आहे. परंतु त्यांनीही त्याबाबत काहीच केलेले नाही. इ.क्र.८७, वुड हाऊस रोड हया धोकादायक इमारतीतील रहिवाशांबरोबर अनेक बैठका घेऊनही रहिवाशी जागा खाली करण्यास तयार नाहीत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारत धोकादायक असल्याने इमारतीतील रहिवाशांच्या जागा खाली करुन घेणे ही मंडळाची नैतिक जबाबदारी आहे. भविष्यात जर दुर्घटना होऊन जिवित वा वित्त हानी झाल्यास मंडळास दोषी धरले जाईल. हयामुळे रहिवाशांच्या जागा खाली करुन घेण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पातळीवर जसे उपाध्यक्ष/प्रा., मुख्य अधिकारी किंवा शासन स्तरावर पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे सुचविले केले की, मंडळाच्या सदस्यांनी व अधिका-यांनी हया इमारतीस भेट देऊन इमारतीच्या दुरुस्तीसाठी रहिवाशांकडे निधी उपलब्ध आहे किंवा नाही हयाी खात्री करुन घ्यावी. आज आपण जारी केलेले ८८ (३) (अ) प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर भविष्यात निधी अभावी दुरुस्ती न झाल्याने पुन्हा ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करण्याची पाळी येऊ शकते. त्यामुळे सन्मा. सदस्य सर्वश्री. गजेंद्र लष्करी, बाप्पा सावंत व उस्मान गणी कुरेशी(लालीभाई) हयांनी हया इमारतीस भेट देऊन वस्तुस्थिती काय आहे हयाची खातरजमा करावी व तदनंतर सदर प्रस्ताव मंडळापुढे फेर सादर करावा. हया सर्वानुमते अनुमती देण्यात आली.

-----------------oo-----------------

बाब क्रमांक : ९४.३ (ई)

विषय- इ.क्र.३३,ब, मुगभाट क्रॉस लेन व ५५-५५ए टी.जी.पथ
हया इमारतीच्या दुरुस्तीबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता /दक्षिण हयांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र.३३,ब, मुगभाट क्रॉस लेन व इ.क्र. ५५-५५ ए , टी.जी.पथ हया दोन्ही इमारत स्वतंत्र असून हया इमारतींची दुरुस्ती स्वतंत्रपणे करण्यात आली आहे. मात्र हया दोनही इमारत एकाच विभाग/ क्रमांकाखाली उपकरप्राप्त आहेत. सद्यः इ.क्र. ५५-५५ ए , टी.जी.पथ हया इमारतीची दुरुस्ती चालू आहे. दोन्ही इमारतींचा विभाग एकच असल्याने दुरुस्ती नंतर मात्र दोन्ही इमारतीचा उपकर वाढणार आहे. त्यामुळे रहिवाशांनी हया दोन्ही इमारतींची संयुक्त दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे. हयामुळे हया दोन्ही इमारतींची दुरुस्ती संयुक्तरित्या करण्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४/७४६

इ.क्र. इ.क्र.३३,ब, मुगभाट क्रॉस लेन व इ.क्र. ५५-५५ ए , टी.जी.पथ हया दोन्ही इमारतींचा विभाग क्रमांक एकच असल्याने हया दोन्ही इमारतींची दुरुस्ती प्रचलित प्रशासकीय मान्यतेच्या आधीन राहून एकत्रितपणे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------oo-----------------

<u>बाब क्रमांक : १४.३ (उ)</u>

विषय- इ.क्र.९०,जे.एस.एस.रोड हया इमारतीच्या दुस-या टप्प्यातील दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ७१ ते ७३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता /दक्षिण हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीच्या कामांचे नकाशे व अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. २७.०६.२००१ रोजीच्या बैठकीत रु.५४५१३०/- खर्चास (रु.६४८.६८ प्रति चौ.मी. दराने) प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले असून हया कामाच्या अंतिम देयकानुसार प्रत्यक्षात झालेला खर्च रु.६५९३०४/- आहे. त्यामुळे प्रशासकीय मंजूरीपेक्षा रु.१,१४,१७४/- खर्च झाला आहे. त्यामुळे प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.१०००/- प्रति चौ.मी. मर्यादेतील वाढीव खर्च रु.१०३५५०/- हयास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

तदनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता हयांनी असे प्रतिपादन केले की, प्रशासकीय मंजरीपेक्षा जो वाढीव खर्च झाला आहे त्याची टक्केवारी १० टक्क्यापेक्षा जास्त असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीतील नियम क्र. १३४ (सी) नुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. मात्र हया प्रकरणात काम पूर्ण झाले असल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यापेक्षा प्रत्यक्षात जो खर्च झाला आहे त्यास सुधारित प्रशासकीय मंजूरी देणे संयुक्तिक होईल.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७४७

इ.क्र.९०,जे.एस.एस.रोड हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीसाठी झालेल्या प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या रु.६५९३०४/- खर्चास कार्योत्तर सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---------------------oo---------------------

बाब क्रमांक : १४.३ (ऊ)

विषय- दक्षिण परिमंडळातील जुन्या व मोडकळीस उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ७५ ते २०३ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील अे. विभागातील ७, बी. विभागातील १३, सी१-२ विभागातील २, सी३-४ विभागातील ७, डी-१ विभागातील ९ व डी-२ विभागातील ९ अशा एकूण ५४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

पृ.क्र. १८९ वर सादर केलेल्या इ.क्र.५, सोनावाला बिल्डिंग या इमारतीतील रहिवाशांनी त्यांच्या इमारतीची दुरुस्ती स्वखर्चाने करण्याची इच्छा प्रस्तावित केली असल्याने सदर अंदाजपत्रक वगळण्यात येत आहे. हयाशिवाय पूरक कार्यसूचीमध्ये पृ.क्र.३६३ ते ४१७ वर दक्षिण परिमंडळातील एकूण २१ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण ७४ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १४/७४८

दक्षिण परिमंडळातील एकूण ७४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

------------ooo------------

<u>उत्तर परिमंडळ</u>

<u>बाब क्रमांक : ९४.४ (अ)</u>

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.२०५ ते २७१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील १०, फग/द विभागातील २, फग/ऊ विभागातील १० अशा एकूण २२ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी मुळ कार्यसूचीत सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय पूरक कार्यसूचीमध्ये पृ.क्र.४१९ ते ४४३ वर उत्तर परिमंडळातील एकूण १० इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण ३२ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९४ / ७४९</u>

उत्तर परिमंडळातील एकूण ३२ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------------oooo---------------

<u>बाब क्रमांक : ९४.४ (ब)</u>

विषय- सन २००३ च्या पावसाळापूर्व पाहणीत धोकादायक म्हणून घोषित केलेल्या इमारतींची सद्यःस्थिती.

....

सदर माहिती पृ.क्र.२७३ ते २८१ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

उपमुख्य अभियंता/उत्तर हयांनी तदनुषंगाने इमारतीनिहाय धोकादायक इमारतींची सद्यःस्थिती सभागृहास विषद केली.

सदर माहितीच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी मंडळामार्फत बांधण्यात येत असलेल्या जयकोच संक्रमण शिबीराबाबत मंडळास काहीच माहिती नसल्याचे सांगून त्याबाबतची माहिती मंडळास अवगत करण्याची सूचना केली. तसेच मा. सभापती हयांनी असेही प्रतिपादन केले की, यापुढे संक्रमण शिबीरातील गाळे एस.आर.ए. योजनेच्या विकासकांना देण्यात देऊ नयेत तसेच आतापर्यंत एस.आर.ए. योजनेच्या ज्या विकासकांना संक्रमण शिबीरातील गाळयांचे वाटप केले आहे ते गाळे विकासकाकडून मंडळाच्या ताब्यात घेण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही त्वरित करावी.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एस.आर.ए. योजनेंतर्गत ज्या विकासकांना संक्रमण शिबीरातील गाळयांचे वाटप केले आहे त्या विकासकांना मंडळास गाळे परत करण्याबाबत नोटीसा पाठविल्या असून गाळे मंडळाच्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---------------------------------oo---------------------------------

<u>बाब क्रमांक : ९४.५</u>

विषय- धनाजी बाई बिल्डिंग, २९-२९-अे, जेल रोड , मुंबई-०९ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित धनाजी बाई बिल्डिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३ (ब) नुसार अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.२८३ ते २८९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उप अभियंता/सहकार संस्था कक्ष हयांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत अ. वर्गात उपकरप्राप्त असून हया इमारतीमध्ये एकूण १९ भाडेकरु आहेत. नियमानुसार किमान ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांची हया प्रस्तावास संमती असून मंडळाच्या मंजूरीनंतर सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या मंजूरीसाठी सादर करावयाचा आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव शासनाकडे भुसंपादनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यास मंजुरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९४ / ७५०</u>

धनाजी बाई बिल्डिंग, २९-२९-अे, जेल रोड , मुंबई-०९ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित धनाजीबाई बिल्डिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-------------oo-------------

पुरवणी कार्यसूची :-

बाब क्रमांक : ९४.६ (१)

विषय- मुं.इ.दु.व पु.मंडळाच्या ९० व ९१ व्या बैठकीचे अनुपालन अहवाल.

अ) इ.क्र.२-४-६-८-१०-१२, अकरावी गल्ली हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे.सी.बी.ॲांड सन्स हयांची निम्नतम दराची निविदा स्विकृतीबाबत.

ब) ८७, वुड हाऊस, कुलाबा, सी.एस.क्र.७३, नाथालाल पारेख मार्ग, ही धोकादायक इमारत रिकामी करण्याबाबत.

....

सदर अनुपालन अहवाल पृ.क्र.२९१ ते ३०५, ३०५-अ, व ३०५-ब वर माहितीसाठी सादर करण्यात आले आहेत.

------------oo------------

बाब क्रमांक : ९४.६ (२)

विषय- इ.क्र.३-५,६५-अ, ब, क,डॉ. भालेराव मार्ग, मुंबई डी. विभाग हया पुनर्रचित इमारतीच्या नामांकन प्रस्तावास मान्यता देणेबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३०७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पुनर्रचनेचे काम पूर्ण करण्यात आले असून हया नवीन इमारतीस रहिवाशांनी वटवृक्ष हे नाव देण्याचे सुचविले आहे. त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४/७५१

इ.क्र.३-५,६५-अ, ब, क,डॉ. भालेराव मार्ग, मुंबई डी. विभाग हया ठिकाणी पुनर्रचित केलेल्या इमारतीस वटवृक्ष हे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

------------oox------------

बाब क्रमाक : ९४.६ (३)

विषय- इ.क्र. १७५-१७७ व १७५, डी, मौलाना आझाद रोड,ई विभाग,भूखंड पाहणी क्र. १७३७, १७३८, भायखळा विभाग या इमारतीच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या टप्पा-१ करिता सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३०९ ते ३२१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र. १७५-१७७ व १७५, डी, अशा एकूण तीन इमारती असून हया तिन्ही इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना हाती घेण्यात आली आहे. नियोजित इमारतीच्या नकाशांना म.न.पा.ने दि. २६.१०.९९ रोजी मंजूरी दिली आहे. हया संयुक्त पुनर्बांधणीच्या रु. ९२.७३ लक्ष खर्चास मंडळाच्या दि. १०.५.९४ रोजीच्या बैठकीत प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. समोरील दोन इमारती (क्र. १७५ व १७७) सुस्थितीत असल्याने हया इमारतीतील रहिवाशांनी पुनर्बांधणी योजनेस विरोध केला आहे. हयाबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्याकडेही बैठक झाली असून हया बैठकीत ठरल्यानुसार पुनर्रचनेच्या कामास विलंब होऊ नये म्हणून सद्यः फक्त इ.क्र. १७५,डी पुरतीच पुनर्बांधणी योजना हाती घेण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे नियोजित इमारतीचे नकाशे म.न.पा.ने दि. ०३.०३.२००३ रोजी मंजूर केले आहेत व हया इमारतीखालील जागा संपादित केलेली असून तिचा ताबाही मंडळाने घेतलेला आहे. त्यामुळे आता पहिल्या टप्प्यात इ.क्र. १७५,डी पुरतीच पुनर्बांधणी योजना प्रस्तावित केली असून त्यासाठी रु. १,५०,३०,८४३/- खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाच्या सुधारित प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती हया पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७५२

इ.क्र.१७५-१७७ व १७५, डी, हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेतील टप्पा-१ मध्ये हाती घेण्यात आलेल्या इ.क्र.१७५, डी पुनर्बांधणी योजनेच्या रु.१,५०,३०,८४३/- खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी

सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---------------oo---------------

बाब क्रमाक : ९४.६ (४)

विषय- इ.क्र.१४७ डीमटीमकर रोड,ई विभाग,भूकर पाहणी क्र.१४२०, भायखळा विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३२३ ते ३६९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने हया इमारतीची पुनर्बांधणी योजना हाती घेतली असून नियोजित इमारतीच्या नकाशांना म.न.पा.ने दि. २५.०७.२००३ रोजी मंजूरी दिली आहे. मंजूर नकाशांनुसार जून्या इमारतीतील १३ निवासी + २ अनिवासी अशा एकूण १५ गाळयांऐवजी नवीन इमारतीत १४ निवासी + २ अनिवासी = १६ गाळे बांधले जाणार आहे. हया योजनेसाठी रु.४१२६६४४/- खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. प्रशासकीय मंजूरीनंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७५३

इ.क्र.१४७ डीमटीमकर रोड,ई विभाग,भूकर पाहणी क्र.१४२०, भायखळा विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या रु.४१२६६४४/- खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

-------------------oo-----------------

बाब क्रमाक : ९४.६ (५)

विषय- अँटॉप हिल वडाळा येथील संक्रमण शिबीराचा पुनर्विकास करण्यासाठी इ.क्र.१, टप्पा-२ चे पाईल फाऊंडेशन व सुपर स्ट्रक्चर बांधकामाच्या निम्नतम निविदेस स्विकृती देण्याबाबतचा प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृ.क्र.३३१ ते ३३५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी असे प्रतिपादन केले की, अँटॉप हिल वडाळा येथे मंडळाचे तळ मजला स्वरुपाचे संक्रमण शिबीर गाळे आहेत.हया संक्रमण शिबीरातील गाळयांच्या पुनर्विकासाची योजना मंडळाने हाती घेतली असून पहिल्या टप्प्यामध्ये चार इमारतींचे बांधकाम पूर्ण केले असून त्यामध्ये ९६८ गाळे बांधण्यात आले आहेत. टप्पा क्र.२ मध्ये एकूण ३ नवीन

इमारती बांधण्यात येणार असून त्यापैकी सद्यः एक इमारत तळ + ७ मजले स्वरुपाची बांधून त्यामध्ये एकूण १७३ गाळे बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. हयासाठी प्रशासकीय मंजूरी घेण्यात आलेली आहे. हया इमारतीच्या रु.४,९२,३५,१७९/- रक्कमेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण १० निविदा प्राप्त झाल्या असून २१ टक्के उणे दराची आहे व सदर निविदा मंडळाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, निविदा रक्कम व कंत्राटदाराच्या निविदेच्या दरामध्ये रु. १,०३,३९,४३०/- चा फरक येत आहे. इतक्या कमी दराच्या निविदा आपण अद्याप स्विकारलेल्या नाहीत. इतक्या कमी रक्कमेमध्ये ठेकेदार कामाचा दर्जा चांगला राखून काम करेल किंवा नाही हयाबाबत साशंकता वाटते.

उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया ठेकेदाराकडे सद्यः कामे नाहीत. त्यामुळे तसेच काम प्राप्त करुन घेण्याच्या चुरशीमुळे निविदा कमी दराने प्राप्त झालेली आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, चुरशीमुळे एक कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करुन काम प्राप्त करुन घेणे संयुक्तिक वाटत नाही. इतक्या कमी दराने निविदा सादर केल्यामुळे आपल्या निविदेची रक्कम व त्यातील कामांचे दर बरोबर आहेत किंवा नाहीत याबाबतही संदिग्धता निर्माण होत आहे. तसेच निविदा ही एक कोटी रुपये आर्थिक फायदा गृहित धरुन तयार केली आहे का ? अशीही साशंकता वाटते. इतक्या कमी दराच्या निविदा मंजूर करणे चुकीचे आहे.

उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जानेवारी-२००२ ते ऑगस्ट-२००३ हया कालावधीमध्ये ज्या काही निविदा मंजूर मंजूर झाल्या आहेत त्या कामांचा सर्वसाधारण दर रु. ५८९/- प्रति चौ.फू. आहे. प्रस्तावित कामाचही दर रु. ५६१/- प्रति चौ.फू. येत आहे. केव्हा केव्हा कंपनीचे दैनंदिन कामकाज चालू राहण्याच्या दृष्टीने कमी नफ्यामध्येही कामे करावी लागतात.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, सादर केलेल्या निविदेमध्ये कंत्राटदारास आर्थिक फायदा नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे ठेकेदार त्याचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने कामाचा दर्जा चांगला राखणार नाही अशी शक्यता वाटते. त्यामुळे कामाच्या दर्जाची खात्री कोण देणार अशी विचारणा मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी केली.

उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,हया कामासाठी मंडळाने कामाच्या देखरेखीसाठी वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती केलेली आहे. श्री. आर.एन. रायकर, स्ट्रक्चरल इंजिनीयर हे वास्तुशास्त्रज्ञ असून त्यांच्या कर्मचारीवर्गातर्फे हया कामाची दैनंदिन पाहणी केली जाणार

आहे तसेच ही जागा रिकामी असल्याने ठेकेदाराला काम करण्यास कोणतीच अडचण उदभवणार नाही तसेच बांधकामासाठी आवश्यक असणारी सर्व यंत्रणा सदर ठेकेदाराकडे आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, बांधकामासाठी लागणारी यंत्रणा ही प्रत्येक ठेकेदाराकडे असावीच लागते.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, आपल्याकडे संक्रमण शिबीरात राहणा-या रहिवाशांकडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यानुसार संक्रमण गाळयांच्या बांधकामाच्या दर्जाबाबत तक्रारी आलेल्या अहेत. हया ठेकेदाराच्या पंजीकरण प्रमाणपत्रानुसार रु. ७.५० कोटी रक्कमेपर्यंतची कामे सदर ठेकेदार करण्यास पात्र आहे. पटेल बिल्डिंग हया इमारतीच्या पुनर्रचनेचे कामही सदर ठेकेदार मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. निविदेसोबत सादर केलेल्या, त्यांच्याकडील कामांच्या यादीमध्ये उरण हया ठिकाणचे तसेच अन्य ठिकाणच्या त्याच्या कामांची माहिती देण्यात अलेली नाही. त्याच्या हातात सद्यः जर १५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमची कामे असतील तर हे काम आपण त्याला देऊ शकणार नाही. त्यामुळे सदर ठेकेदाराच्या हातात सद्यःस्थितीत किती रक्कमेची कामे आहेत हयाची खातरजमा करणे आवश्यक आहे. मात्र सदर निविदा फारच कमी दराची असल्याने, कामाच्या दर्जाच्या दृष्टीने सदर निविदा फेटाळण्यात यावी असे वाटते.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, राजीव गांधी प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींची सद्यःस्थिती पाहता कामाच्या चांगल्या दर्जाच्या दृष्टीने इतक्या कमी दराची निविदा मंजूर करणे संयुक्तिक होणार नाही असे वाटते. आता आपल्या मंडळाला हया इमारतींच्या दुरुस्तीसाठी/देखभालीसाठी खर्च करावा लागत आहे.

उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ही निविदा आपण जर फेटाळली तर नव्याने निविदा मागविल्यानंतर याहीपेक्षा कमी दराची निविदा प्राप्त होऊ शकते किंवा जर जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यास व स्विकारल्यास लेखा शाखेकडून आक्षेप घेतले जातील.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, कामकाज चांगले होण्याच्या दृष्टीने लेखा शाखेकडून आक्षेप घेतले जातात. पस्तुत प्रकरणीही कामाचा दर्जा चांगला होण्याच्या दृष्टीनेच आपण सदर निविदा फेटाळण्याबाबत चर्चा करीत आहोत. त्यामुळे त्यास लेखा विभागामार्फत आक्षेप घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मुख्य लेखाधिकारी, दु. व पु. हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही निविदा फेटाळून नव्याने मागविलेली निविदा जर फेटाळलेल्या निविदेच्या दरापेक्षा अधिक दराने स्विकारल्यास त्यास लेखा विभागामार्फत निश्चितच आक्षेप घेतले जातील. अशाप्रकारचे आक्षेप अनेक प्रकरणांत घेतले गेलेले आहेत. फेटाळलेल्या निविदेच्या दरापेक्षा कमी दराची फेर निविदा स्विकारल्यास लेखा

विभागामार्फत आक्षेप घेतले जाणार नाहीत. कामाचा दर्जा योग्य राखण्याच्या दृष्टीने अतिरिक्त खबरदारीच्या उपाययोजना केल्यास प्रस्तुत निविदा मंजूर करण्यास हरकत नसावी.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की,कामकाज चांगले होण्याच्या दृष्टीने तसेच मंडळाचे अव्यवहार्य आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने लेखा विभागातर्फे आक्षेप घेतले जातात. परंतु प्रस्तुत प्रकरणी आपण नवीन बांधल्या जाणा-या गाळयांच्या लाभार्थिंना चांगली घरे बांधून देण्याच्या दृष्टीने बांधकामाचा दर्जा चांगला राहावा म्हणून ही निविदा फेटाळल्यास त्या लेखा विभागामार्फत आक्षेप घेण्याचा प्रश्न उदभवत नाही. ज्या निविदेचा दर २१ % उणे आहे अशी निविदा मंजूर केल्यास संबंधित ठेकेदार कामाचा दर्जा कसा राखेल हयाबाबतची खात्री देता येत नाही. त्यामुळे अशा अधिक कमी दराच्या निविदा मंजूर करणे संयुक्तिक होणार नाही असे वाटते. मागील ३ वर्षांच्या कालावधीमध्ये हया मंडळाने ज्या काही निविदा मंजूर केल्या आहेत त्यामध्ये इतक्या कमी दराची एकही निविदा मंजूर केलेली नाही. सुरुवातीला जेव्हा १६ % उणे दराची निविदा मंडळापुढे सादर केल्यानंतर तत्कालिन उपमुख्य अभियंता श्री. देसाई साहेब हयांच्याबरोबर हयाचप्रमाणे बरीच चर्चा करण्यात आली होती. त्यामुळे अशा अतिशय कमी दराच्या निविदा स्विकारु नयेत अशी ठाम भूमिका घेणे गरजेचे आहे व त्यादृष्टीने मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना पारीत करणे आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर योजनेच्या कामाची मे. कॅनॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन हयांची निम्नतम निविदा फेटाळण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९४ / ७५४</u>

अँटॉप हिल वडाळा येथील संक्रमण शिबीराच्या पुनर्विकास योजनेतील पहिल्या टप्प्यातील इ.क्र.१ च्या बांधकामाची मे. कॅनॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन हयांची २१% उणे दराची निम्नतम निविदा फेटाळण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---o---

<u>बाब क्रमाक : ९४.६ (६)</u>

विषय- इ.क्र. १अ, १बड, १क, १ई,१जी, १एच, १एच, १एफ, १एस, १आर, ५-७, आणि ९ गनपावडर रोड, या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ३३७ ते ३५३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेत एकूण १२ जून्या इमारतींचा समावेश असून त्यापैकी ५ इमारती म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित केल्या आहेत. हया पुनर्बांधणी योजनेच्या अंदाजित खर्च रू.४,१८,९९,४४०/- असून त्यास मंडळाची सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.प्रशासकीय मंजूरीनंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला जाईल.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७५५

इ.क्र.१अ, १बड, १क, १ई,१जी, १एच, १एच, १एफ, १एस, १आर, ५-७, आणि ९ गनपावडर रोड, या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रू.४,१८,९९,४४०/- खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

----------oo----------

<u>बाब क्रमांक : ९४.६ (७)</u>

विषय- न्यू गिरगांवकर वाडी, शितला देवी रोड, माहिम, मुंबई-०१६ या नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तें अंतर्गत उपकरप्राप्त इमारतींना म्हाड अधिनियम प्रकरण-८ खाली मंडळाने दिलेली मंजूरी मागे घेण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३५५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हयामध्ये एकूण २९ जून्या इमारती असून त्यापैकी ७ इमारती उपकरप्राप्त आहेत. हया इमारतीतील रहिवाशांनी म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) नुसार सादर केलेल्या नियोजित सह. गृह.नि. संस्थेच्या प्रस्तावास दि. २२.०१.२००१ रोजी मंजूरी देण्यात आली आहे. मात्र आता हया सह. गृह.नि. संस्थेच्या मुख्य प्रवर्तकांनी ते स्वतः पुनर्रचना करु शकत नसल्याने कलम १०३ (बी) खालील प्रस्ताव बाजूला ठेऊन मंडळानेच हया इमारतीची पुनर्रचना करावी अशी विनंती केली आहे. त्यामुळे कलम १०३ (बी) अंतर्गत प्रस्तावास दिलेली मंजूरी रद्द करण्यासाठी मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७५६

न्यू गिरगांवकर वाडी, शितला देवी रोड, माहिम, (प.) मुंबई-०१६ येथील रहिवाशांनी नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) नुसार सादर केलेल्या प्रस्तावास देण्यात आलेली मंजूरी रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---------------------------oo---------------------------

बाब क्रमाक : ९४.६ (८)

विषय- नवीन गिरगांवकर वाडी, शितला देवी रोड, माहिम,(प.) या वसाहतीच्या इमारतीसह भूसंपादन करुन पुनर्बांधणी योजना राबविण्यासाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.३५७ ते ३६१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित वसाहतीची पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून हया योजनेच्या रु. ३१,७७,९२,२२०/- खर्चास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. मंडळाच्या मंजूरीनंतर कलम ४१ (१) नुसार भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९४ / ७५७

नवीन गिरगांवकर वाडी, शितला देवी रोड, माहिम, (प.) या वसाहतीच्या नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत पुनर्बांधणी योजनेच्या रु.३१,७७,९२,२२०/- खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली तसेच म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ४१ (१) नुसार हरस मालमत्तेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---------------------------oo---------------------------

बाब क्रमाक : ९४.७

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांमध्ये सादर करण्याचे प्रस्ताव

१) विषय- फितवाला रोड ग/द विभाग येथील इ.क्र.७,९,११,२४-ड या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेच्या उर्वरित जोत्यावरील बांधकामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

....

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या जोत्यावरील बांधकामाचे कंत्राट ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता हयांना देण्यात आले होते. परंतु ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने तसेच करारपत्रातील अटी व शर्तींचे पालन न केल्याने करारपत्राच्या कलम ३ सी नुसार सदर ठेकेदारावर कंत्राट करण्याची कार्यवाही करण्यात आली होती. हया कार्यवाहीच्या अनुषंगाने सदर ठेकेदाराने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. हया याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार सदर याचिका ठेकेदाराने मागे घेतली व मा. उच्च न्यायालयाने मंडळास निविदेची कार्यवाही चालू ठेवण्याचे व न्यायालयाच्या परवानगीशिवाय काम सुरु न करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार हया कामाच्या निविदा प्राप्त झाल्या असून मे. कैलास महादेव आणि कं. हयांची १६.१० % उणे दराची निम्नतम निविदा मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे. सदर निविदा मंजूर केल्यानंतर काम सुरु करण्यापूर्वी मा. उच्च न्यायालयास अहवाल सादर करावयाचा आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर निम्नतम निविदा मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>**ठराव क्रमांक : ९४ / ७५८**</u>

इ.क्र.७,९,११,२४-डी, फितवाला रोड या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेच्या उर्वरित जोत्यावरील बांधकामाची मे. कैलास महादेव आणि कं. हयांची १६.१० % उणे दराची निम्नतमन निविदा सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

---------------------------------------oo---------------------------------

२) विषय- मुं.इ.दु. व पु.मंडळामधील अनिवासी गाळेधारकांना पुनर्रचित इमारतीमधील गाळे वाटप करताना ५ टक्के क्षेत्रफळाची सूट देण्याबाबत.

....

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी/दु.व पु.यांनी असे प्रतिपादन केले की, १८० चौ.फू. क्षेत्रफळाच्या गाळयासाठी पूर्वी ५ टक्के अतिरिक्त क्षेत्रफळाची सवलत होती. दि. ७.४.२००३ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळाने २२५.०० चौ.फू. क्षेत्रफळाच्या गाळयांनाही ५ टक्के अतिरिक्त क्षेत्रफळाची सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. हया सवलतीच्या अनुषंगाने काही अनिवासी

गाळेधारकांनी मा. सभापती हयांना भेटून अशी विनंती केली आहे की, ज्याप्रमाणे निवासी गाळयांसाठी ५ टक्के अतिरिक्त क्षेत्रफळाची सवलत देण्यात येते त्याचप्रमाणे अनिवासी गाळयांनाही सवलत देण्यात यावी. अशा प्रकारची सवलत अनिवासी गाळयांसाठी पूर्वी देण्यात आलेली नाही. हया परिस्थितीत मंडळाने हयाबाबत निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळेधारकांच्याबाबतीत पूर्वी अतिरिक्त क्षेत्रफळाची सवलत देण्याचा प्रश्नच निर्माण न झाल्याने आपण त्यांना सवलत दिली नसावी.

सहमुख्य अधिकारी/दु.व पु.यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अनिवासी गाळेधारकांना आपण त्यांच्या जून्या इमारतीतील अनिवासी गाळयांच्या क्षेत्रफळाएवढाच गाळा नवीन इमारतीत बांधून देत असतो. त्यांना वाढीव क्षेत्रफळ दिले जात नाही. हयामुळे अतिरिक्त क्षेत्रफळासाठी आपण बाजारभावाप्रमाणे किंमत आकारत असतो.

मा. सभापती यांना तदनुषंगाने अशी विचारणा केली की, एखाद्या अनिवासी गाळयाचे क्षेत्रफळ हे नियोजनातील अडचणीमुळे जून्या गाळयाचे क्षेत्रफळापेक्षा जास्त बांधावे लागले व संबंधित अनिवासी गाळेधारकाने जर त्याला त्याच्या जास्तीचे क्षेत्रफळ न देता त्याच्या जून्या गाळयाच्या क्षेत्रफळाएवढाच नवीन गाळा देण्याची विनंती केल्यास आपली भूमिका काय असेल ? आपण अतिरिक्त क्षेत्रफळाचे गाळे बांधण्यापूर्वी अतिरिक्त क्षेत्रफळाची कल्पना संबंधित रहिवाशांना दिल्यास ते त्याबाबत विचार करु शकतात. अतिरिक्त क्षेत्रफळाची कल्पना आपण गाळयाचा ताबा देताना संबंधित रहिवाशांना देता त्यामुळे वाद निर्माण होऊन संबंधि गाळयांचा ताबा घेण्यास चालढकल होते.

का.अ./पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्यावेळी जून्या इमारतीतील गाळयांचे क्षेत्रफळ हे वेगवेगळे असते त्यावेळी नवीन इमारतीचा आराखडा तयार करताना शक्यतो तेवढयाच क्षेत्रफळाचे गाळे बांधण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र नियोजनातील अडचणींमुळे व संरचनेच्या दृष्टीने काही गाळयांचे क्षेत्रफळ कमीजास्त होते.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पूर्वी तांत्रिक समिती होती, ज्यामध्ये अशा अतिरक्त क्षेत्रफळाचे दर निश्चित केले जात होते. आज अशाप्रकारची तांत्रिक समिती नसल्याने दर निश्चितीसाठी प्राधिकरणापुढे प्रस्ताव पाठवावे लागतात. अशा प्रकरणांच्या बाबतीत व्यवहार्य दृष्टीकोनातून निर्णय घेणे आवश्यक आहे. क्षेत्रफळाच्या वादामुळे नवीन गाळे बांधून पूर्ण होऊनही त्याचा ताबा एका वर्षापासून दिला जात नाही. त्यामुळे अतिरिक्त क्षेत्रफळाच्या बांधकामासाठी होणारा खर्च रहिवाशांकडून घेऊन किंवा अन्यप्रकारे हयाबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. आपण जरी सवलत देऊ शकत नसलो तरी गाळयांचा ताबा त्वरित देण्याच्यादृष्टीने आवश्यक कार्यवाही त्वरित करण्यात यावी. अतिरिक्त क्षेत्रफळाच्या वादाबाबत सहमुख्य अधिकारी हयांनी रहिवाशांबरोबर बैठक

घेऊन त्यातून मार्ग काढून ताबा त्वरित देण्याबाबतची कार्यवाही करण्याचे आदेश मा. सभापती हयांनी दिले.

---------------------oo-----------------

३) विषय- मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.

....

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील १२ प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१. अंतिम भूखंड क्र.२७७,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-५५९४ (२) इ.क्र.१३-१३ एल, मोगल लेन, माहिम,मुंबई येथील " अग्रवाल इस्टेट " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र.१४६/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.१७८, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७१७२ (२-२एबी-२बी), इ.क्र. ६७-६७ए - ६७बी, भालचंद्र रोड, दादर, मुंबई येथील " राधा निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र.३ / ५१९,(अंशतः),विभाग क्र. बी-२८७९ (५८१३ डी डी) इ.क्र.२९, जी जी, ४५ एफ आणि ४९ ए, ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई येथील " फेलोशिप सोसायटी " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४. अंतिम भूखंड क्र.४४९,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३३०१(५) व ३३०१, (५ए) इ.क्र.६८, ६८बी, नर्दुल्ला टँक रोड, दादर (प.),मुंबई येथील " किर्तने बिल्डिंग " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासांकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

५. अंतिम भूखंड क्र.११४२, नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४५७५ (१),इ.क्र.२८४-२८४ए, कॅडेल रोड (वीर सावरकर मार्ग), दादर, मुंबई येथील " सुर्यकला भवन " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

६. अंतिम भूखंड क्र.१३६३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन - ५३१६ /१डी माहीम फोर्ट, माहीम,मुंबई येथील "राहत बसर मंझील" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

७. अंतिम भूखंड क्र.३२९,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३२१४(५),इ.क्र. ३२ डी, भवानी शंकर रोड, दादर (प.),मुंबई येथील " म्हात्रे हाऊस " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.११० / १० माटुंगा विभाग भूखंड क्र. १११ दादर माटूंगा इस्टेट (द.) विभाग क्र. एफएन-७२५२ (२) इ.क्र. ४, हिन्दू कॉलनी रोड नं.४, दादर,(पू), मुंबई येथील " लक्ष्मी निकेतन " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९. भुकर पहाणी क्र.१०४०, मांडवी विभाग, विभाग क्र. बी-१७४३ इ.क्र.१२, इस्त्राईल मोहल्ला,मुंबई येथील मुमताझ मॅन्शन नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१०. भुकर पहाणी क्र.१५६०, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३८७६ (२) , इ.क्र.७-९-११, मोहमेडन रोड (उमर रजाब रोड) भायखळा,मुंबई येथील "कलईवाला चाळ " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

११. भुकर पहाणी क्र., २२७०, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४९९०-९१, इ.क्र.७, खत्तर अली लेन,मुंबई हया पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१२. भुकर पहाणी क्र.९४/१० लोअर परेल विभाग, विभाग क्र.जीएस-२११९ (२), इ.क्र.३२० सी, ३२० डी, व ३२२-३२२ सी, फर्ग्युसन रोड (२६९ ते २७३/८१ ना.म.जोशी मार्ग) लोअर परेल, मुंबई येथील " इराणी चाळ " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये ७० टक्के रहिवाशांची संमती असुन अर्जदारांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केली आहे. इमारतीतील रहिवाशांची यादी, त्यांच्या जागेचे क्षेत्रफळ, जून्या इमारतीचा नकाशा व रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे विभागीय कार्यालयाने प्रत्यक्ष जागेवर तपासून प्रमाणित केली आहेत.

अ.क्र.१२ वर सादर केलेल्या इमारती चाळीच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, हयाप्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशांचा अवमान होऊ नये

तसेच शासनाच्या आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याची खातरजमा करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील सादर केलेल्या १२ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींवर ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९४ / ७५९</u>

मुंबई बेटावरील खालील १२ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. अंतिम भूखंड क्र.२७७,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-५५९४ (२) इ.क्र.१३-१३ एल, मोगल लेन, माहिम,मुंबई येथील " अग्रवाल इस्टेट " भुकर पहाणी क्र.१०४०, मांडवी विभाग, विभाग क्र. बी-१७४३ इ.क्र.१२, इस्त्राईल मोहल्ला,मुंबई येथील "मुमताझ मॅन्शन "

२. भुकर पहाणी क्र.१४६/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.१७८, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७१७२ (२-२एबी-२बी), इ.क्र. ६७-६७ए - ६७बी, भालचंद्र रोड, दादर, मुंबई येथील " राधा निवास"

३. भुकर पहाणी क्र.३/५१९,(अंशतः),विभाग क्र. बी-२८७९ (५८१३ डी डी) इ.क्र.२९, जी जी, ४५ एफ आणि ४९ ए, ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई येथील " फेलोशिप सोसायटी "

४. अंतिम भूखंड क्र.४४९,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३३०१(५) व ३३०१, (५ए) इ.क्र.६८, ६८बी, नर्दुल्ला टँक रोड, दादर (प.),मुंबई येथील " किर्तने बिल्डिंग "

५. अंतिम भूखंड क्र.११४२, नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४५७५ (१),इ.क्र.२८४-२८४ए, कॅडेल रोड (वीर सावरकर मार्ग), दादर, मुंबई येथील " सुर्यकला भवन "

६. अंतिम भूखंड क्र.१३६३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन - ५३१६ /१डी माहीम फोर्ट, माहीम,मुंबई येथील "राहत बसर मंझील"

७. अंतिम भूखंड क्र.३२९,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३२१४(५),इ.क्र. ३२ डी, भवानी शंकर रोड, दादर (प.),मुंबई येथील " म्हात्रे हाऊस "

८. भुकर पहाणी क्र.११० / १० माटुंगा विभाग भूखंड क्र. १११ दादर माटूंगा इस्टेट (द.) विभाग क्र. एफएन-७२५२ (२) इ.क्र. ४, हिन्दू कॉलनी रोड नं.४, दादर,(पू), मुंबई येथील " लक्ष्मी निकेतन "

९. भुकर पहाणी क्र.१०४०, मांडवी विभाग, विभाग क्र. बी-१७४३ इ.क्र.१२, इस्त्राईल मोहल्ला,मुंबई येथील " मुमताझ मॅन्शन "

१०. भुकर पहाणी क्र.१५६०, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३८७६ (२) , इ.क्र.७-९-११, मोहमेडन रोड (उमर रजाब रोड) भायखळा,मुंबई येथील "कलईवाला चाळ"

११. भुकर पहाणी क्र., २२७०, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-४९१०-९१, इ.क्र.७, खत्तर अली लेन,मुंबई ही मालमत्ता.

१२. भुकर पहाणी क्र.९४ लोअर परेल विभाग, विभाग क्र.जीएस-२११९ (२), इ.क्र.३२० सी, ३२० डी, व ३२२-३२२ सी, फर्ग्युसन रोड (२६९ ते २७३/८१ ना.म.जोशी मार्ग) लोअर परेल, मुंबई येथील " इराणी चाळ "

------------oo----------------

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, मंडळाच्या मागील बैठकीतील चर्चेनुसार ज्या पुनर्विकास योजनांना ना हरकत प्रमाणपत्र देऊनही पुनर्विकासाची कामे सुरु झालेली नाहीत अशा प्रकरणांमध्ये काय कार्यवाही करण्यात येत आहे?

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा एकूण १३० प्रकरणांमध्ये ना हरकत प्रमाणपत्र रद्द का करण्यात येऊ नये ? हयाबाबतच्या कारणे दाखवा नोटीसा संबंधित ना हरकत प्रमाणपत्रधारकांवर बजावण्यात आल्या आहेत व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पुनर्रचनेची कामे वर्ष किंवा त्यापूर्वीही पूर्ण होऊनही गाळयांचे ताबे संबंधित रहिवाशांना दिले जात नाहीत. " लखपती " बिल्डिंगबाबतही असे घडलेले आहे. फेब्रु-२००२ मध्ये सदर इमारतीच्या पुनर्रचनेचे काम पूर्ण झाले आहे. मात्र बी.ई.एस.टी.च्या मागणीच्या व पाण्याच्या वादामुळे अद्याप गाळयांचा ताबा देण्यात आलेला नाही.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारत पूर्ण झाल्यानंतर विद्युत पुरवठयाची मागणी केली की, इमारतीत सबस्टेशन बांधून देण्याची मागणी बी.ई.एस.टी. करते. इमारतीत जागा नसल्यामुळे सबस्टेशन बांधणे अवघड होऊन बसते. अशावेळी इमारतीतील एक किंवा दोन गाळे सबस्टेशनला दिल्यानंतर त्यास मुख्य अग्निशम अधिकारी आक्षेप घेतात सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर त्याचे नकाशे तयार करुन त्यास म.न.पा.ची मंजूरीही घेण्यास मंडळास सांगण्यात येते. अशावेळी दोन-तीन महिन्यांचा कालावधी जातो. लखपती बिल्डिंगसाठी आपण काही अटी व शर्तीवर भोगवटा प्रमाणपत्र मिळविले आहे. दि. १२.१०.२००३

पर्यंत रस्ते खोदण्यास मनाई असल्याने पाणी पुरवठयाची सोय करता आलेली नाही. मात्र आता लवकरच पाणी पुरवठयाची सोय करुन गाळे वाटप होईल.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर उदवाहन, पाणीपुरवठा व विद्युत पुरवठा हयासाठी तात्काळ उपाययोजना करुन गाळे वाटप करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आजच्या स्थितीत ४-५ इमारती बांधून आपण पूर्ण केल्या आहेत. मात्र म.न.पा.ने भोगवटा प्रमाणपत्र न दिल्याने त्यांचे गाळे वाटप करता येत नाही. इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर उदवाहन, पाणीपुरवठा व विद्युत पुरवठा हयासाठी संबंधित कार्यालयांकडे पाठपुरावा करावा लागतो. यामुळे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यास विलंब होतो. भायखळा येथे एक इमारत पुनर्रचित करण्यात आली आहे. हयाठिकाणी बी.ई.एस.टी.कार्यालयाने सब स्टेशनची मागणी केली आहे. हया इमारतीत जागा नसल्याने शेवटी दोन गाळे आपण सब स्टेशनसाठी दिले. म.न.पा. व बी.ई.एस.टी.किंवा अन्य शासकीय कार्यालये नेहमीच मंडळावर त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी दबाव आणतात. दोन गाळे बी.ई.एस.टी.ला सब स्टेशनसाठी दिल्यानंतर मुख्य अग्निशमन अधिकारी हयांनी त्यास आक्षेप घेतले आहेत. हयामुळे अद्याप विद्युत पुरवठा न मिळाल्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र दिले जात नाही. हया सर्व बाबींची पूर्तता करण्यामध्ये बराच कालावधी जातो. हयाबाबत वेळोवेळी संबंधित वरिष्ठ अधिका-यांशी चर्चा केली जाते व भोगवटा प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात असतात. ३-५, भालेराव मार्ग व दुर्गादेवी येथे पुनर्रचित केलेल्या इमारतींमध्ये सब स्टेशनच्या वादामुळे भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी विलंब हयाबाबत बी.ई.एस.टी.चे मा. आयुक्त श्री. स्वाधीन क्षत्रीय हयांच्याशी चर्चा केल्यानंतर वाद संपुष्टात आला आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी मुख्य अधिकारी, उपमुख्य अभियंता (पुनर्र.) व मंडळाचे संबंधित अधिकारी हयांच्याशी चर्चा केली आहे. त्यानुसार भोगवटा प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळविण्याच्या दृष्टीने प्रत्येकावर जबाबदा-या सोपविण्यात आल्या आहेत व हयाबाबत मा. अध्यक्ष तसेच मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांचीही मदत घेतली जाणार आहे. भोगवटा प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळविण्याच्या दृष्टीने काही अडचणी निर्माण झाल्यास त्याबाबत संबंधित अधिका-यांनी वरिष्ठ पातळीवर चर्चा करुन उपाययोजना करावी तसेच हयाबाबत मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांच्या स्तरावर मा. म.न.पा. आयुक्त हयांच्याशी पत्रव्यवहार करुन उपाययोजना करण्याच्या दृष्टीने मुख्य अधिकारी हयांनी पाठपुरावा करावा. मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग हे देखील पुनर्रचनेच्या कार्यक्रमास गती देण्यासाठी प्रयत्नशील असल्याने त्यांच्या स्तरावरही हयाबाबत पाठपुरावा करावा. यापुढे भूमिपूजन झाल्यानंतर किंवा इमारत

पूर्ण होत आली आहे असे समजल्यानंतर लगेच पाणीपुरवठा , विद्युत पुरवठा हयासाठी पाठपुरावा आगाऊ करण्यात यावा. कर्मचा-यांच्या कमतरेबाबत मुख्य अधिकारी यांनी मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्याकडे पाठपुरावा करुन कर्मचारी उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर " विजयश्री " इमारतीबाबत नेमकी काय वस्तुस्थिती आहे ? अशी विचारणा करुन त्याबाबत त्वरित कारवाई करण्याची विनंती केली.

उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीत एकूण ३७ रहिवाशी आहेत. हयापैकी १० रहिवाशांच्या व्हेकेशन नोटीसमधील नावांमध्ये ३-४ वेळा खाडाखोड करुन बदल करण्यात आला आहे. विभागीय अधिका-यांना पाठविलेल्या रहिवाशांच्या वितरण यादीमध्ये हया १० रहिवाशांची नावे नाहीत. त्यामुळे हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती कार्यकारी अभियंता, फग/द.विभाग हयांच्या कार्यालयाकडून मागविली आहे. वस्तुस्थिती प्राप्त होताच त्वरित गाळे वाटपाची कार्यवाही केली जाईल.

मा. सभापती हयांनी बैठकीच्या शेवटी त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्यावतीने तसेच त्यांच्या पक्षाच्या वतीने मंडळाचे सर्व सन्मा. सदस्य तसेच सर्व अधिकारी/कर्मचारीवर्ग यांना दिपावली व नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या व आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढील बैठक मंगळवार दि. ११.११.२००३ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनीही त्यांच्या पक्षाच्यावतीने मा. सभापती, सन्मा. सदस्य तसेच सर्व अधिकारी/कर्मचारीवर्ग यांना दिपावली व नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या

नि.का.अ./ मुं.इ.दु.व पु.मंडळ

मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ

मंडळाच्या दिनांक १२/९/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी दिलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.

अ.क्र	इमारतीचा तपशिल	दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	मजल्यांची संख्या भाडेकरुंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम	शेरा
	अ विभाग								
१.	इ.क्र. १२-१२-अे, कुमठा स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३ १० + १२= २२	८१६.२५ ७९६.४२	६५०००७७.००	४५०००७७.००	४५०००७७.००	०	मंजूर
२.	इ.क्र. २२ वाच्छा गांधी मार्ग	पहिला ना.ह.प्र.	तळ + २ ५ + ०= ५	५९०.७७ १५६९.६०	९२७२७७.००	९२७२७७.००	५९०७७४.००	३३६५०३.००	मंजूर
३.	इ.क्र. १३५-१३७, बोरा बाझार स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३ ५ + २= ७	२८७.११ ९९६.६२	२८६१४०.००	१७३९६३.००	१७३९६३.००	०	मंजूर
४.	इ.क्र. ८ वूड हाऊस रोड	चौथा मंडळ	तळ + ३ ७ + १२= १९	३०२०.७० ८६२.८२	२४७७६८४.००	१३७१२२०.५०	१३७१२२०.००	०	मंजूर
५.	इ.क्र. ३३-३५, शाहिद भगत सिंग रोड	तिसरा मंडळ	तळ + ३ १२ + १४= २६	१८१४.७८ ९०९.९१	१६५१२९२.००	७२२१००.००	७२२१००.००	०	मंजूर
६.	इ.क्र. १७६-१८०, पेरिन नरीमन स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ४ ४ + १३= १७	१२८७.२१ ९९७.७३	१२८४२८४.००	३२७०३०.००	३२७०३०.००	०	मंजूर
	ब विभाग								
७.	इ.क्र. १८ नवरोजी हिल रोड नं.५	तिसरा मंडळ	तळ + ३ ४८ + ०= ४८	१४६५.३४ ९४४.९३	१३८४५४८.००	४२४४६३.००	४२४४६३.००	०	मंजूर
८.	इ.क्र. १६-१८ गरीबदास स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ४+५ अशंतः ११ + १०= २१	७२०.१० ६४५.९५	४६५१५१.००	३१६८७७.००	३१६८७७.००	०	मंजूर
९.	इ.क्र. १६४-१६६ कांबेकर स्ट्रीट	पहिला पुनःसुधारीत मंडळ	तळ + ३ १४ + १०= २४	८२९.४२ १३९३.५६	९९६७७६.००	९९६७७६.००	९८१७७६.००	१५०००.००	मंजूर

१०.	इ.क्र. २७९-२८१ अब्दुल रहेमान स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ ३ + ७= १०	५०५.३० ९८१.०६	४१५७२०.००	२४३०७०.००	२४३०७०.००	०	मंजूर
११.	इ.क्र. १७९-१८९ काझी सय्यद स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३ १९ + ९= २८	१३५६.३३ ७००.१८	९४९६८७.००	८३४९४३.००	८३४९४३.००	०	मंजूर
१२.	इ.क्र. १३८-१४० बी. जे शहा मार्ग	तिसरा मंडळ	तळ + २ १४ + ४= १८	३१०.७० १०१४.४९	३१५२०३.००	९९७७८.००	१९५२७६.००	४५०२.००	मंजूर
१३.	इ.क्र. १-९ ओल्ड बंगालीपुरा	तिसरा मंडळ	तळ + ३ १० + ६= १६	३९३.५२ १०४७.९५	४१२३१०.००	१७९३५२.००	१६०४८३.००	१८८६९.००	मंजूर
१४.	इ.क्र. ४७-४९ नागदेवी स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ २ + २३= २५	५०४.१२ ११२६.६०	५६७९४४.००	२१४००८.००	१५०१८७.००	६३८२१.००	मंजूर
१५.	इ.क्र. ७-९-११ कुभारवाडा	पहिला मंडळ	तळ + ५ १ + २१= २२	६३०.८७ ६९८.२४	४४०५००.००	४४०५००.००	४४०५००.००	०	मंजूर
१६.	इ.क्र. ५० सारंग स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३ ५ + ३= ८	४४१.५६ ९२९.५४	४१०४४८.००	२९८१७०.००	२९८१७०.००	०	मंजूर
१७.	इ.क्र. ९ केशवजी नाईक रोड	चौथा मंडळ	तळ + ३ २१ + १६= ३७	१३९५.०० ९९९.२६	१३९३९७३.००	३६९७४५.००	३६९७४५.००	०	मंजूर
१८.	इ.क्र. ९७-९९ निशाणपाडा रोड	तिसरा मंडळ	तळ + २ ६ + २= ८	६९१.९८ १०१५.१८	७०२४१६.००	५१३११६.००	५०२६१२.००	१०५०४.००	मंजूर
१९.	इ.क्र. १८-२० तांडेल स्ट्रीट	चौथा मंडळ	तळ + ३ २५ + २= २७	६७९.२० ९८९.९२	६७२३५५.००	१६४६१३.००	१६४६१३.००	०	मंजूर
	सी-१/२ विभाग								
२०.	इ.क्र. ६५-७१ संत सेना महाराज मार्ग	तिसरा मंडळ	तळ + ३ ३६ + १६= ५२	११६४.०० ८४५.१३	९८३७३०.००	२५६०४३.००	२५६०४३.००	०	मंजूर
२१.	इ.क्र. ३८-४० निझाम स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ २ + ४= ६	४३८.३० १४३१.६०	६२७४७२.००	१७८५५२.००	-१०६१८.००	१८९१७०.००	मंजूर
२२.	इ.क्र. १५६-१५८ इब्राहिम रहितुल्ला रोड	तिसरा मंडळ	तळ + ३ ६ + ८= १४	४३७.०० ९३५.१७	४०८६७०.००	२२२१८४.००	२२२१८४.००	०	मंजूर

२३.	इ.क्र. १७६-१८०, अब्दुल रहेमान स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ५ ९ + १०= १९	१३३५.७३ ४७८.२०	६३८७४३.००	५३२३१०.००	५३२३१०.००	०	मंजूर
२४.	इ.क्र. २९ दुसरी कारपेंन्टर स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ + ३+४ भाग १५ + १= १६	५१२.०० ७७६.३४	३९७४८५.००	२९७४८५.००	२९७४८५.००	०	मंजूर
२५.	इ.क्र. ९३ दुसरी पठाण स्ट्रीट	दुसरा ना.हे.प्र.	तळ + ३ ६ + ४= १०	२२०.३३ २४४७.३०	५३९२१३.००	५००२१६.००	४६८३३२.००	३१८८४.००	मंजूर
	सी-३/४ विभाग								
२६.	इ.क्र. ४७ वेलींग्टन रोड	दुसरा मंडळ	तळ + ४ ६ + २= ८	२२९.०९ ९९८.०३	२२८६३९.००	२००७२५.००	२००७२५.००	०	मंजूर
२७.	इ.क्र. २३-२५, झावबा वाडी	दुसरा मंडळ	तळ + १ अशंतः १९ + १= २०	३५२.८२ ९५१.०४	३३५५५८.००	१८४७९५.००	१८४७९५.००	०	मंजूर
२८.	इ.क्र. ७अे, झावबा वाडी	दुसरा मंडळ	तळ + १ १६ + ०= १६	४८६.०० ९८६.५२	४७९४४९.००	३९१२२९.००	३९१२२९.००	०	मंजूर
२९.	इ.क्र. ९१-के, सिताराम पोवद्दार मार्ग	पांचवा मंडळ	तळ + ३ ५८ + ०= ५८	२३३०.०० ९५६.१४	२२२७८१२.००	७००५५३.००	७००५५३.००	०	मंजूर
३०.	इ.क्र. १९ तेल गल्ली [१५अे तेलवाडी]	तिसरा मंडळ	तळ + ४ १५ + १८= ३३	५२८.५४ ९८५.६२	५२०९४१.००	१२४५३६.००	१२४५३६.००	०	मंजूर
३१.	इ.क्र. ४ पिकेट रोड, [आर. एस. सप्रे मार्ग]	तिसरा मंडळ	तळ + ४ १११ + ०= १११	६८६०.३२ ३८१.३८	२६१६४३७.००	१०१९४७३.००	१०१९४७३.००	०	मंजूर
३२.	इ.क्र. ५ पहिली पोफळवाडी	दुसरा मंडळ	तळ + ३ ११ + २= १३	३५६.१० ९९७.९९	३५४८०८.००	१६३४७३.००	१६३४७३.००	०	मंजूर
३३.	इ.क्र. ७-७अे, ७बी, अनंत वाडी	तिसरा मंडळ	तळ + २ १० + ४= १४	४९३.३४ ८७६.९७	४३२६४६.००	२४५९७९.००	२४५९७९.००	०	मंजूर
३४.	इ.क्र. १२४-१४० प्रिन्सेस स्ट्रीट, शामलदास गांधी मार्ग	चौथा मंडळ	तळ + ४+५ अशंतः ४ + ५४= ५८	२२२९.०० ९९७.५०	२२२३४४०.००	६०५२२२.००	६०५२२२.००	०	मंजूर
३५.	इ.क्र. २२-२४ अनंतवाडी	दुसरा मंडळ	तळ + ५ ९९ + २१= १२०	३५१५.५४ ४१४.३९	१४५६८२१.००	९५६८२१.००	९५६८२१.००	०	मंजूर

३६.	इ.क्र. १ पहिली सोनापूर क्रॉस लेन	तिसरा मंडळ	तळ + २ १० + ०= १०	२१४.०६ ९९८.५२	३१३७४४०.००	१०६७१४.००	१०६७१४.००	०	मंजूर
३७.	इ.क्र. ६-१० भाई जिवनजी लेन	तिसरा मंडळ	तळ + २ २० + १= २१	६९६.३० ९९७.७८	६९४७५६.००	२०२६३७.००	२०२६३७.००	०	मंजूर
	डी-१ विभाग								
३८.	इ.क्र. १०-१२ बी.जी. खेर	दुसरा मंडळ	तळ + १ ३० + १८= ४८	५९५.०० १०२९.९३	६१२८०७.००	३९३७१४.००	३७५९०६.००	१७८०८.००	मंजूर
३९.	इ.क्र. ३८७-३९७ व ३८७-३७९ व्ही. पी. रोड, बदामवाडी,	तिसरा मंडळ	तळ + ३ २३ + १६= ३९	१११९.४९ १०२१.३१	११३५१४८.००	६६५३५९.००	६४१६७३.००	२३६८६.००	मंजूर
४०.	इ.क्र. ४४ गावदेवी रोड	दुसरा मंडळ	तळ + १ ४ + ३= ७	१३१.८८ ११००.५८	१४५१४५.००	९९६५२.००	८६३८८.००	१३२६४.००	मंजूर
४१.	इ.क्र. ७-६अे, ७बी, ७एफ, गांवदेवी मार्ग [चोकसी-बिल्डींग]	दुसरा सुधारीत मंडळ	तळ + ५ ४३ + ९= ५२	१७४९.६५ ८८४.१३	१५४६९१८.००	११४६५१८.००	११४६५१८.००	०	मंजूर
४२.	इ.क्र. २-२सी, ४-४बी, मंगलवाडी	दुसरा मंडळ	तळ + ५ ३० + १८= ४८	३३००.१३ ३३३.६०	११००९१७.००	८५६३२८.००	८५६३२८.००	०	मंजूर
४३.	इ.क्र. १५७-१५९, जे. एस. एस. रोड	दुसरा मंडळ	तळ + ३ अशंतः ६ + १४= २०	११७३.४० ६७२.८२	७८९४८४.००	६०६५३७.००	६०६५३७.००	०	मंजूर
४४.	इ.क्र. ३८६ एफ, व्ही. पी. रोड	तिसरा मंडळ	तळ + ३ २५ + १६= ४१	८५३.४४ ९००.३५	७६८३९२.००	२१३६५६.००	२१३६५६.००	०	मंजूर
	डी-२ विभाग								
४५.	इ.क्र. ८ तारा टेंपल लेन	पहिला मंडळ	तळ + २ ३ + ९= १२	३८२.१० ९६७.१९	३६९५६४.००	३६९५६४.००	३६९५६४.००	०	मंजूर
४६.	इ.क्र. ८ जमशेटजी पेटीट स्ट्रीट [१५ महिला पटेल अग्यारी लेन	तिसरा मंडळ	तळ + ३ ८ + १= ९	९६३.३१ १०१०.११	९७२९५६.००	५७१५५१.००	५७१५५१.००	०	मंजूर

४७.	इ.क्र. २७८-२७८-ए, एम. एस. अली रोड,	दुसरा मंडळ	तळ + १ १ + १= २	२९५.६० ७६२.००	२२५२५०.००	१७०२५०.००	१७०२५०.००	०	मंजूर
४८.	इ.क्र. १०-१०-ए, खेतवाडी ७वी लेन	तिसरा मंडळ	तळ + ४ २२ + १०= ३२	७८८.५० १०३८.७८	८१९०८२.००	४५९६८२.००	४२९१०४.००	३०५७८.००	मंजूर
४९.	इ.क्र. ३-५, उरणवाला स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ १५ + ०= १५	१२५३.१२ १००२.०७	१२५५७२५.००	७५१७०३.००	७४९१०९.६०	२५९४.००	मंजूर
५०.	इ.क्र. २८ रतन टाटा रोड	चौथा मंडळ	तळ + ४ ४० + ९= ४९	२७६४.७७ ९८९.५२	२७३२२७८.००	१२२०३०.००	१२२०३०.००	०	मंजूर

परिशिष्ट "ब"

मंडळाच्या दि.१०/९/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

अ. क्र	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा मंडळ/ ना.ह.प्र.	मजले भाडेकरु नि+अनि=एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. दर चौ.मी.चा खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम	शेरा
१.	ई	अ	३७, म्हातारपाखाडी रोड, माझगांव, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ १ ४ + २= ६	१३५.७८ ९६९.०२	१३१५७४/- १३१५७४/-	१३१५७४/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	४६-४८, टँक स्टीट, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ३८ + २ = ४०	६३९.७७ १००८.४३	६४५१६२/- १६५३३५/-	१५९९४३/-	५३९२/-	-"-
३.	-"-	-"-	२०१-ए, डॉ.मस्करेन्हास रोड, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + २ ६ + ० = ६	४८५.०० ९८८.९२	४७९६३०/- ३५१७५२/-	३५१७५२/-	--	-"-
४.	-"-	-"-	१३-१३ए, दुसरी घेलाबाई स्टीट, मदनपुरा, मुंबई	सहावा टप्पा मंडळ	तळ + २ २२ + ७ = २९	७४३.८१ १२६२.२९	९३८९०७/- २१९४०२/-	१६९३०५/-	५००९७/-	-"-
५.	फ.ग/द	अ	८६-के, वरळी कोळीवाडा, वरळी, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ १ १० + ० = १०	३३७.०० ९९५.२८	३३५४११/- ३३५४११/-	३३५४११/-	--	-"-
६.	-"-	-"-	१३३-बी, मेघवाडी बिल्डींग, डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ८७ + ० = ८७	१८३९.२४ ९७१.४२	१७८६६९२/- ५५६९००/-	५५६९००/-	--	-"-
७.	-"-	-"-	४, तेजुकाया मॅन्शन, डॉ.आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ० ३२ + ० = ३२	४५२.४० ९०४.७०	४०९२८९/- ३९३५३३/-	३९३५३३/-	--	-"-
८.	-"-	-"-	९, कुमार महल, आई माई मेरवानजी स्ट्रीट, परळ, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ २८ + २ = ३०	७१२.०० ९८१.५८	६९८८८५/- ३५३५४८/-	३५३५४८/-	--	-"-
९.	-"-	-"-	३७५-अे, ठोकरशी चाळ, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ३९ + ० = ३९	१०४५.२२ १२७७.७५	१३३५५१०/- ५५१६१०/-	२६१३००/-	२९०३१०/-	-"-
१०.	-"-	-"-	३९१, रावते बंगला, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ+ २ १५ + १ = १६	३२४.४० ९९१.५१	३२१६४९/- १०८६९३/-	१०८६९३/-	--	-"-

३३

८९

११.	-"-	-"-	३४-३६, मिस्त्री बिल्डींग, सन मिल लेन, लोअर परळ, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ+ २ १८ + २ = २०	१३०८.८७ ९८१.६३	१२८४८३२/- २९८७२७/-	[illegible]७२७/-	--	मंजूर
१२.	-"-	-"-	४६, विरा बिल्डींग, एलफिन्स्टन रोड, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ+ २ २८ + ८ = ३६	६७०.०० ९८३.६०	६५९०१७/- १६९५८५/-	१६९५८५/-	--	-"-
१३.	फ.ग/द	अ	१६, ला संता मारिया, वासुदेव पेडणेकर मार्ग (सेंट झेवियर स्ट्रीट) नायगांव, मुंबई	दु.टप्पा सुधा. मंडळ	तळ+ ३ १६ + ० = १६	१३२३.८६ ८६७.७१	११४८७२९/- १०५७७३१/-	१०५७७३१/-	--	-"-
१४.	-"-	-"-	२४९, दातार बिल्डींग, साने गुरुजी मार्ग, मुंबई	दु.टप्पा सुधा. मंडळ	तळ+ ३ ४५ + ८ = ५३	१३६८.२४ १०००.९७	१३६९६२०/- ९५९१४८/-	९५९१४८/-	--	-"-
१५.	-"-	-"-	१२०-बी, कृष्णा नगर, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई	चौ.टप्पा सुधा. मंडळ	तळ+ ३ १३०+ ० = १३०	३०७५.३२ १०१९.९५	३१३६६७९/- २०९३८०४/-	२०३२४४५/-	६१३५९/-	-"-
१६.	फ.ग/उ	अ	३१७-अे, त्रिवेदी निवास क्र.१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ ८ + ० = ८	३७३.०९ ८३३.२१	३१०८६६/- ३१०८६६/-	३१०८६६/-	--	-"-
१७.	-"-	अ	८३-ई, कुसुम निवास, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ४ ६ + ३ = ९	४३७.३८ ५५०.९८	२४०९९०/- २४०९९०/-	२४०९९०/-	--	-"-
१८.	-"-	ब	प्लॉट नं.१४८, रसिक कुंज, रस्ता २५, सायन (प), मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + २= १०	५८५.७२ ६७९.४०	३९७९४४/- ३९७९४४/-	३९७९४४/-	--	-"-
१९.	-"-	क	३५-ई, लक्ष्मी बिल्डींग,मोगल लेन, माहिम मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + ०= ८	३६०.८१ ९५५.०४	३४४५९०/- ३४४५९०/-	३४४५९०/-	--	-"-
२०.	-"-	-"-	२१-एच, कासा करोलिना, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + ०= ८	५०८.६९ ९७२.९८	४९४९५०/- ४९४९५०/-	४९४९५०/-	--	-"-
२१.	-"-	-"-	३३-एफ, प्रसन्ना बिल्डींग, सितलादेवी टेंपल मार्ग, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ ८ + ०= ८	४६७.१९ ८४०.६८	३९२७६०/- ३९२७६०/-	३९२७६०/-	--	-"-
२२.	-"-	अ व क	६०१-अे, आसावा मेन्शन, डॉ.बी.ए.रोड, माटुंगा, मुंबई	पहिला टप्पा ना.ह.प्र.	तळ + ३ १० + ०= १०	५७२.९० ८०६.५४	६२३३७९/- ६२३३७९/-	६२३३७९/-	--	-"-
२३.	फ.ग/उ	अ	२२एफ, २२ आय, महावीर बिल्डींग, भांडारकर मार्ग, माटुंगा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ १ १० + १५ = २५	१०९०.५८ ९८२.८२	१०७१८५६/- ७४४६८३/-	७४४६८३/-	--	-"-

२४.	-"-	क	२१६, वनकुंज, आर.ए.किडवाई मार्ग, वडाळा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ १२ + ०= १२	८१५.१६ ७२८.३९	५९३७६१/- ५९३७६१/-	५९३७६१/-	--	मंजूर
२५.	-"-	-"-	प्लॉट नं. १६, चंद्रव्हिला, शिवडी वडाळा रोड, वडाळा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +२+ भाग ३ ७ + ०= ७	४७१.४७ ९८०.८९	४६२४६२/- ३९५०७४/-	३९५०७४/-	--	-"-
२६.	-"-	अ	१५९-अे, तंबाखुवाला बिल्डींग, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ४४ + १७= ६१	१७४०.५२ ७१४.२६	१२४३११०/- ४३५७३४/-	४३५७३४/-	--	-"-
२७.	-"-	अ	१५-एच, मोहमदी मंझील, गोखले रोड, दादर, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ४ २२ + ०= २२	९६९.३१ ९८८.७३	९५८३९४/- ४२७०५९/-	४२७०५९/-	--	-"-
२८.	-"-	अ व क	१९१-१९३डी, रतनमाई महल, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + ५ ७९ + १२= ९१	४३०२.८९ ८८८.८१	३८२४४८४/- १२५४२१७/-	१२५४२१७/-	--	-"-
२९.	-"-	-"-	२२-२२अे, कवडे बिल्डींग, धारावी गल्ली, धारावी रोड, धारावी, मुंबई	दु. टप्पा सुधा. मंडळ	तळ + १ ७ + १= ८	९०७.४९ ९८९.२२	८९७७१५/- ८७६२९६/-	८७६२९६/-	--	-"-
३०.	-"-	-"-	१६-२०, गोपाळ भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई	दु. टप्पा पुर्नःसुधा. मंडळ	तळ + २ २८ + २५= ५३	१५२०.०० ९११.९९	१३८६२२७/- १२१७००९/-	१२१७००९/-	--	-"-